**CNR No. MHOS120002312017**
आर.सी.एस. क्र. १०/२०१७
बिभीषण वि. शासन

**निशाणी क्र. ६० खालील आदेश.**

०१. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदारातर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ आणि आदेश २२ नियम ३ अन्वये मयत वादी क्र.२ नामे रावसाहेब मारुती लोहार यांचे वारस अभिलेखावर घेण्यात यावे या विनंतीसह दाखल केलेला आहे. अर्जातील कथनांप्रमाणे प्रस्तुत दाव्यातील वादी क्र.२ नामे रावसाहेब मारुती लोहार हे दिनांक १५/१०/२०२१ रोजी मयत झालेले आहेत व त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

| अ.क्र. | वारसांचे नांव व पत्ता | मयताशी नाते |
|---|---|---|
| २/१. | लता रावसाहेब अंकुश (लोहार),<br>वय – ५८ वर्षे, रा. घाटपिंपरी, ता. वाशी. | पत्नी |
| २/२. | ज्योती गणेश इघे,<br>वय – ३५ वर्षे, रा. कल्याण, मुंबई. | मुलगी |
| २/३. | स्वाती बाळू पवार,<br>वय – ४० वर्षे, रा. सिरबाई, ता. सांगोला, जि. सोलापूर. | मुलगी |
| २/४. | आरती जितेंद्र थोरात,<br>वय – ३२ वर्षे, रा. राहु, ता. दौंड, जि. पुणे. | मुलगी |
| २/५. | अभिषेक रावसाहेब अंकुश (लोहार),<br>वय – ३३ वर्षे, रा. घाटपिंपरी, ता. वाशी. | मुलगा |
| २/६. | अभिजीत रावसाहेब अंकुश (लोहार ),<br>वय – ३१ वर्षे, रा. घाटपिंपरी, ता. वाशी. | मुलगा |

०२. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज मुदतीत

असल्याने हरकत घेणे नाही असे म्हटले आहे.

०३. मी सदर अर्जावर वादीतर्फे युक्तीवाद ऐकलेला आहे.

०४. प्रस्तुत प्रकरणातील वादी क्र.२ नामे रावसाहेब मारुती लोहार हे दि. १५/१०/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. मयत वादी क्र. २ चे मृत्यु प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल करण्यात आले आहे. मृत्यु प्रमाणपत्रावर मयताचे नाव रावसाहेब मारुती अंकुश असे नमूद करण्यात आले आहे. वारस रेकॉर्डवर घेण्यास वादीने प्रस्तुतचा अर्ज मुदतीत दिलेला आहे. सदर दावा हा मिळकतीचे वाटप होऊन त्याचा पृथक कब्जा वादीस वाटप होऊन त्याचा प्रत्यक्ष ताबा मिळणेबाबतचा आहे. मयत वादी क्र.२ यांचे वारसांचे हक्क व हितसंबंध दाव्यात समाविष्ट असल्यामुळे मयत वादी क्र.२ चे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी वादींना देणे न्यायोचित होईल. सबब, खालील आदेश.

## आदेश

१. नि. क्र. ६० खालील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादींनी आवश्यक ती दुरुस्ती तात्काळ करावी व दुरुस्ती वादपत्र तात्काळ दाखल करावे.

Digitally signed by VARSHA BALVANTRAO PATIL
Date: 2022.01.07 04:34:07 +0530

दिनांक – ०७.०१.२०२२

(सौ. व्ही. बी. पाटील),
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
भूम.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | Devidas S. Shiral,<br>Stenographer - Grade II |
| Court | --- | Smt. V. B. Patil,<br>Jt. Civil Judge, Senior Division, Bhoom,<br>District-Osmanabad. |
| Date | --- | 07/01/2022 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 07/01/2022 |
| Order uploaded on | --- | 07/01/2022 |